International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.6 July – Aug 2022

# ''महात्मा फुले यांची सामाजिक सुधारणेत भूमिका''

**प्रा. डॉ. अभय श्रीहरी लाकडे**
सहाय्यक प्राध्यापकए फुले—आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली
***Corresponding Author-* प्रा. डॉ. अभय श्रीहरी लाकडे**
Email- abhaylakadek@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7070569

**सारांश :—**

आधूनिक भारतातील पहिले समाजक्रांतीकारक म्हणून परिचित महात्मा फुले हे सामान्य परिवारातील असले तरी त्यांचे विचार असामान्य स्वरफपाचे होते? सामाजिक विषमतेविरुध्द महात्मा फुलेनी बंड पुकारले. समाजामध्ये समता प्रस्थापित करण्यासाठी बहुजनवर्गांना संघटीत करण्याचे काम केले. समता सोबतच त्यांनी शिक्षणावर भर दिला. बहुजन वर्गानी उच्चशिक्षण घेऊन समाजव्यवस्थेत त्यांनी काम केले पाहीजे. महाराष्ट्रातील गरीब, शेतकरी, स्त्रिया, पिडीत बहुजन वर्गासाठी काम करण्यासाठी त्यांनी दिवसरात्र मेहनत घेऊन त्यांना सामाजिक बंधनातून मुक्त करुन त्यांनी चांगले जिवन जगले पाहिजे यासाठी त्यांनी प्रत्येक गोष्टीच्या मुळाशी जाऊन चिंतनशीलपणे त्यावर विचार करीत असत. त्यामुळे महात्मा फुले ना ''महाराष्ट्राचे मार्टीन ल्युथर'' म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणेला त्यांनी वेगळे वलय निर्माण करुन स्त्रियांच्या व अस्पृश्यांच्या उध्दारासाठी तं चंदनासारखे झिजले. त्यांच्या कार्यात अनेक विघ्न संतोषी लोकांनी अडचणी निर्माण केल्या परंतु ज्योतीबांनी त्यावर मात करुन अनेक हालअपेष्टा सहन करुन आपल्या ध्येयापासून मिळमात्र ही दूर न जाता नियमीतपणे काम केले. बहुजन समाज काळोखाच्या गर्द छायेत वावरत होता. जातीयवादाचा पाया भक्कमपणे उभा होता. स्त्रियांच्या व अस्पृश्यांच्या वाईट स्थितीत कुठेही सुधारणा दिसत नव्हती. समाज वेगवेगळया समस्यांनी गस्त होता अशा सामाजिक परिस्थितीत एक ज्योत लावण्याचे काम महात्मा फुले यांनी केले. स्त्रियांच्या उध्दारासाठी त्यांनी मोलाचे कार्य केले म्हणून त्यांना ''स्त्रियांचा उध्दारकर्ता'' असे म्हटले जाते. समाजाच्या तथाकथीत परिस्थितीवर मात करण्यासाठी त्यांनी ''सत्यशोधक समाजाची'' स्थापना करुन समाजपरिवर्तनात स्वत:ला झोकून देऊन काम केले. धार्मिक विषमता कमी करण्यासाठी त्यांनी धार्मिक चालीरिती कशा कालबाहय आहेत यासाठी त्यांनी बहुजन वर्गाना आपल्या मार्गदर्शनाद्वारे नविन दिशा दाखविली.

**प्रस्तावना :—**

समाज सुधारण्यासाठी शिक्षा हाच एकमेव मार्ग आहे हे ज्योतीबांच्या लक्षात आले होते म्हणून त्यांनी शिक्षणाचा आग्रह धरला. बहुजन वर्गांच्या लोकांना विकसीत करायचे असेल तर त्यांनी अगोदर शिक्षण घेतले पाहीजे यासाठी त्यांनी स्त्रिया व शुद्र यांना शिक्षणाचे दरवाजे खुले करण्याचा निश्चय केला. महात्मा फुले यांनी इ.स. १८४८ मध्ये मुलीसाठी पहिली शाळा पुण्यात सुरु केली. शाळा सुरु केली परंतु शाळेस शिक्षीका मिळण्यास अनेक अडचणी येत होत्या म्हणून ज्योतीबांनी आपल्या धर्मपत्नी सावित्रीबाई यांना शिकवून शाळेत शिकविण्यासाठी पाठविण्याचा निश्चय केला. सनातनी लोकांना सावित्रीबाई शाळेत शिकवायला जाते ही बाब पचती न पडल्यामुळे त्यांच्या मार्गात अनेक अडथळे निर्माण करुन शाळेत जाण्यापासून अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र सावित्रीबाई जराही न डगमगता धीराने सर्व संकटावर मात करुन मुलींना शिकविण्यासाठी शाळेत जात होत्या इ.स. १८५२ मध्ये अस्पृश्य मुलांच्यासाठी शाळा सुरु केली. शाळेत येणाऱ्या मुलांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत होता.

समाजामध्ये स्त्रियांवर वेगवेगळया प्रथा, परंपरा, चारिरितीद्वारे अन्याय होत होते. त्यांच्यावर अत्याचार कमी व्हावा यांसाठी स्त्रियांच्या उध्दाराचे कार्य महात्मा फुलेनी हाती घेतले.

त्यांनी विधवा विवाह, पनर्विवाह यांस प्रोत्साहन दिले. महिलांचा वाईट अवस्था पाहून त्यांनी इ. स. १८६३ मध्ये बालहत्या प्रतिबंध गृह स्थापन केले. शेतकरी, शेतमजूर यांचे अनेक प्रश्न समोर आणून ते निवारण ररकरण्याचे कामाने ज्योतिबांना चैन पडत नव्हती. शेतकरी वर्ग सावकाराच्या कर्जाच्या छायेत जिवन जगत आहे. दारिद्रयाने ग्रस्त शेतमजूर वर्ग चाचपडत होता अशा या वर्गामध्ये नवचेतना निर्माण करण्यासाठी ''गुलामगिरी'' व ''शेतकऱ्याचा आसूड'' या दोन ग्रंथाच्या माध्यमातून गोरगरीबांच्या प्रश्नांना वाच्यता फोडण्याचे काम महात्मा फुलेनी केले.

समाजात विषमता, जातिभेद, अज्ञान, वाईट प्रथा हया कशा पध्दतीने निर्मूलन होतील यासाठी प्रयत्न करण्यासाठी सामाजिक सुधारणेची चळवळ उभारुन ती जनसामान्यापर्यंत पोहचविण्याचा कसोशीने प्रयत्न करुन लोकांमध्ये तशा पध्दतीचे परिवर्तन करण्यास भाग पाडले.

**महात्मा फुले यांचे कार्य :—**

**स्त्रियांच्या विकासासाठी कार्य —**

भारतीय समाजाने स्त्रियांना समतेपासून व शिक्षणापासून वंचित ठेवले होते. व्यक्ती जिवनमान विकसीत करण्यासाठी शिक्षण हे एक प्रमुख साधन आहे. शिक्षणाने मनुष्यात स्वाभिमान निर्माण होतो. शिक्षण हे सर्व सुधारणांचे मूळ आहे असे ज्योतीबा फुले यांचे मत होते. ''जिच्या जाती पाळण्याची दोरी ती जगाते उध्दारी'' या तत्वाचे ते पाईक होते. मुलांचे संपूर्णपणे जडणघडण आईकडूनच होत असते. त्यामुळे महिलांनी शिक्षण घ्यायला पाहीजे. आजची मूल भविष्याचे आधारस्तंभ आहेत. त्यामुळे त्यांच्यावर चांगले संस्कार करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक स्त्रियांनी शिक्षण आपले व आपल्या कुटूंबीयांची काळजी घ्यावी, परंतु सनातनी यांनी स्त्री शिक्षणाला विरोध केला, स्त्रिया शिकल्या तर त्या कुमार्गाला लागतील आणि घराची व्यवस्था विस्कळीत होईल. मुलींनी शिक्षण घेतले तर तिला अकाली वैधव्य येईल अशा खुळया समजूती समाजात प्रचलीत होत्या. चुल आणि मुल ऐवढेच त्यांचे कार्यक्षेत्र निश्चित केलेले होते. एकंदरीत त्या काळात समाजाच्या स्त्रीबाबतच्या अपेक्षा, अन्यायी व पक्षपातीपणाच्या होत्या. क्रुर व लज्जास्पद चालीरितीमुळे स्त्रियांची अवस्था अत्यंत बिकट स्वरफपाची होती.

समाजाने स्त्री ला फक्त उपयोग्य वस्तू मानून तिच्यावर नियमितपणे अन्याय, अत्याचार, विरोध, दबाव, असमानता, कोणत्याही अधिकारापासून वंचित ठेवून तिच्यावर नियमीतपणे शोषण समाजाकडून होत होते. ही स्थिती ज्योतीबा फुले यांच्या विचारापल्लीकडे होते म्हणून स्त्रियांच्या उध्दारासाठी त्यांनी कार्य हाती घेतले त्यांनी स्त्रिशिक्षण, विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंध केशवपन यासारख्या सामाजिक समस्येवर काम करुन त्यांनी स्त्रियांना या बंधनातून मूक्त करण्याचे काम ज्योतीबांने केले. या बदलाला त्यांना समाजाचा अत्यांतिक विरोध, अपमान, बंड यांचा सामना करुन स्त्रियांच्या उध्दारासाठी त्यांनी फार मेहनत घेतली या कामी त्यांना सावित्रीबाईनी समर्थपणे साथ दिली. ज्योतीबाच्या प्रत्येक विचार त्यंच्या सोबतीने समाजात रुजविण्यासाठी त्यांनी कठोर परिश्रमासह अपमान, विरोध यांचा सामना करावा लागला. परंतु त्यांच्या मेहनतीचे फळ आज आपल्याला दिसून येत आहे की समाजात आज वाईट प्रथा, परंपरा यांचा बिमोड झालेला असून स्त्रिया शिक्षणाकडे वळलेल्या आहेत. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने अर्थाजन करीत आहेत. स्त्रियांच्या कार्यक्षेत्रामध्ये बदल झालेला आहे. स्त्रियांमध्ये वैचारिक दृष्टीकोन परिवर्तन दिसून येत आहे. स्त्रियांचा राजकारणात, समाजकारणात, अर्थकारणात, शिक्षणक्षेत्रामध्ये, कौटूंबिक कार्यात आज महत्वपूर्ण भूमिका बजावित आहेत. त्यामुळे समाजात स्त्रियांनी आपले महत्व सिध्द केले आहे ते केवळ महात्मा फुले यांनी केलेल्या कार्याच्या प्रेरणातून स्त्रियांमध्ये हे परिवर्तन दिसून येत आहे.

**शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य :—**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतातील ७० टक्के जनता ही ग्रामीण भागात राहून शेती हा व्यवसाय करतो. देशाचा विकास करावयाचा असेल तर शेती व शेतकरी यांचा विकास होणे गरजेचे आहे. परंतु भारतातील शेतकऱ्यांची व शेतीची अवस्था अत्यंत बिकट स्वरुपाची होती. अज्ञान, अशिक्षितपणा, दारिद्रय,

कर्जबारीपणा, मागासलेपणा, निसर्गाचा लहरीपणा यांच्या कचाटयात शेतकरी दिवसरात्र मेहनत करुन देखील त्यांच्या अवस्थेत कुठेही सुधारणा दिसून येत नव्हती. शेतकरी हा अत्यंत दु:खी व क्लेषदायक जिवन जगत होता. सावकार वर्ग शेतकऱ्यांचा अतोनात आर्थिक शोषण करीत होता. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कुणीही बोलण्यास तयार नव्हता अशा सर्व परिस्थितीत ज्योतीबानी अशा शोषीत लोकांमध्ये बदल करण्याचा निश्चय करुन शेतकऱ्यांचे प्रश्न परखडपणे मांडणारे महाराष्ट्रातील समाजचिंतक म्हणून ज्योतीबानी कार्य केले. शिक्षणाशिवाय शेतकरी—शेतमजुरी समाजाची या कठीण परिस्थितीवर मात करुच शकत नाही, त्यासाठी त्यांनी शिक्षणाचा करुन ''शेतकऱ्यांचा आसूड'' या ग्रंथात शिक्षणाअभावी समाजाची दुर्दशा झाली आहे याचे वर्णन केले आहे.

शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण द्यावे, शेतकऱ्यांच्या मुलांसाठी वसतिगृहे सुरु करावीत. व्यावसायिक शिक्षण द्यावे, कनिष्ठ वर्गातील लोकांना नौकऱ्यांमध्ये आरक्षण द्यावे अशा सूचना ज्योतिबांनी केल्या होत्या. शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती आल्यास त्यांना सर्वतोपरी मदत करावी असा त्यांनी आग्रह धरला. शेतकऱ्यांच्या स्थितीत सुधारण्यासाठी त्यांनी पाणीपुरवठा योजनेस त्यांनी अग्रक्रम दिला होता. तलाव, बंधारे, धरणे, विहीरी याद्वारे जास्तीत जास्त पाणी शेतीकरीता उपलब्ध करुन दिला पाहिजे. शेतीला जोडव्यवसाय म्हणून पशूपालनास प्रोत्साहन द्यावे. शेतीवर वाजवी कर आकारावा. कमी व्याजदराने कर्ज पुरवठा करावा. शेतकऱ्यांमध्ये ज्या गैरसमजूती अज्ञानामुळे निर्माण झाल्या आहेत त्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची शिफारस सरकारला केली.

महाराणी विक्टोरिया यांचा मुलगा उयूक ऑफ कनॉट यांनी भारताला भेट दिली त्यावेळेस पुण्यात महात्मा फुले हयांना समारंभाचे मानपत्र दिले होते. समारंभात सर्व महत्त्वपूर्ण व्यक्ती निटनेटके कपडे घालून उपस्थित झाले होते परंतु महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या वेषामध्ये समारंभास हजर झाले होते. त्यावेळी समारभात त्यांना बोलण्यास परवानगी देण्यात आली ज्योतीबा म्हणतात ''डयूक साहेब या ठिकाणी उत्तमोत्तम पोशाख करुन उपस्थित असलेले हे लोक हिंदूस्थानच्या जनतेचे प्रतिनिधी नाहीत. या देशातील बहुसंख्य जनता शेतकरी आहे आणि हे जो पोशाख वापरतात त्यांचे पेहरावात मी त्यांचा प्रतिनिधी म्हणून आपल्या भेटीस आलो आहे. हिंदूस्थानच्या बहुसंख्य जनतेचे हित तुम्हाला करावयाचे असेल तर त्यांचा अज्ञान घालवा त्यांना प्राथमिक शिक्षण मोफत मिळण्याची व्यवस्था करा, असा त्या बहुसंख्या लोकांचा प्रतिनिधी म्हणून माझा निरोप महाराणींना कळवा''

**सत्यशोधक समाजाची स्थापना** :—

सामजिक सुधारणेसाठी शुद्रातिशुद्रांची स्थिती सुधारण्यासाठी ज्योतीबा फुलेनी सत्यशोधक समाजाची स्थापना इ.स. १८७३ मध्ये केली. धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करणे हे या समाजाचे मुख्य उदिष्ट होते. ''सार्वजनिक सत्यधर्म व गुलामगिरी'' या दोन पुस्तकांत ज्योतिबांनी सत्यशोधक समाजाविषयी आपले विचार मांडले आहेत. सत्यशोधक समाजाचे उदिष्ट स्पष्ट करताना ते म्हणतात, ब्राम्हण, भट, जोशी इत्यांदी लोकांच्या दास्यत्वापासून शुद्रलोकांना मूक्त करण्याकरीता व आपल्या मतलबी ग्रंथाच्या आधारे आज हजारो वर्षे ते शुद्र लोकांचा नीच माणून गफलतीने लूटीत आहेत. यास्तव सदुपदेश व विद्याद्वारे यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरीता हा समाज आहे. ''समता, बंधुता व स्वातंत्र्य हे विचार रुजविण्यासाठी त्यांनी हा समाज स्थापन केला होता. 'सत्यशोधक समाज' हा समाज सुधारणेची महाराष्ट्रातील पहिली चळवळ होती त्या समाजाची प्रमुख तत्वे पुढीलप्रमाणे.

१) सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत व परमेश्वर त्याचा आईबाप आहे.

२) आईला भेटण्यास अगर बापाला प्रसन्न करण्यास ज्याप्रमाणे मध्यस्थांची जरुरी नसते त्याप्रमाणे परमेश्वराची प्रार्थना करण्यास पुरोहिताची आवश्यकता नसते.

३) वरील तत्व कबुल असल्यास कोणालाही या समाजाचे सदस्य होता येईल.

सत्यशोधक चळवळ समाजातील कोणत्याही एका विशिष्ट वर्गाविरुध्द नव्हता.

बहूजन समाजात जागृती घडवून आणणे हे प्रमुख उदिष्ट होते. पुरोहिताशिवाय लग्ने लावण्यासाठी मंगलाष्टके मराठीत रचली गेली. जातिभेद कमी व्हावा हाच त्यामागील प्रमुख उद्देश होता. सत्यशोधक समाजाद्वारे उभारण्यात आलेला लढा हा सामाजि, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक गुलामगिरीविरुध्दचा लढा होत. या समाजाच्या कार्यामुळे स्वार्थनिरपेक्ष कार्यकत्यांची नविन पिढी उदयास आली. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरुध्द आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. सत्यशोधक समाजाच आवाज हा हिंदुस्थानात अनेक शतके दडपून टाकलेल्या कनिष्ट समाजाची किंकाळी होय.

**अस्पृश्यांच्या उध्दाराचे कार्य** :—

उच्चवर्णियांकडून अस्पृश्यांना अत्यंत वाईट वागणूक दिली जात होती. समाजजीवनात त्यांना कोणतेही स्थान नव्हते. दारिद्रयातच त्यांचा जन्म होई व त्यातच त्यांचा अंत होई. स्पृश्य—अस्पृश्य शिवून घेत नसत. विद्यार्जनाचा अधिकार त्यांना नव्हता सर्व बाजूंनी उपेक्षीत जीवन त्यांना जगावे लागत होते. अशा कनिष्ठ वर्गातील लोकांचे अज्ञान, निरक्षरता दूर करण्यासाठी त्यांची गुलामगिरीतून मूक्तता करण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. महात्मा फूले हे सामाजिक चळवळीचे आद्यप्रवर्तक होते. समाजातील पददलितांच्या उध्दारांचे कार्य त्यांनी हाती घेतले. अस्पृश्यांना आपल्या हक्काची जाणीव व्हावी म्हणून त्यांना शिक्षण मिळवून देण्याचे कार्य ज्योतीबाने केले. इ.स. १८५२ मध्ये अस्पृश्यासाठी वेताळपेठेत स्वयंखर्चाने शाळा सुरु केली. इ.स. १८५३ ला आपल्या होतकरु मित्राच्या मदतीने महार, मांग इत्यादी लोकांस विद्या शिकविण्याकरीता मंडळी या नावाची संस्था सुरु केली. या कार्यास युरोपियन व ऐतदेशीय शिक्षणप्रेमीनी मदत केली. दक्षिण प्राईज फंडातून काही आर्थिक मदत प्राप्त झाली. इ.स. १८५८ पर्यंत या संस्थेमार्फत तीन शाळा सुरु करण्यात आल्या शाळेतील मूलांना पिण्याचे पाणी याची अडचण निर्माण झाली म्हणून ज्योतीबांनी आपल्या राहत्या घरातील पाण्याचा हौद सर्वांसाठी खूला करुन दिला. अस्पृश्यांच्यात जागृतीसाठी 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहून उच्चभ्रू वर्गावर कठोर टिका केली. जाती व्यवस्थेवर व दांभिकतेवर त्यांनी कोरडे ओढले आहेत. शुद्रांनी आपल्या उन्नतीसाठी विद्या संपादन करावी असा संदेश त्यांनी या ग्रंथात दिलेला आहे. महात्मा फुलेनी बहुजन समाजाच्या उध्दारासाठी लढले. महाराष्ट्रात त्यांनी शिक्षणाची मूहूर्तमेढ रोवली. अस्पुश्यांच्या अन्यायाला वाचा फोडली. सामाजिक गुलामगिरीविरुध्द बंड पुकारले. शेतकऱ्यांची दु:ख ज्योतीबांनी वेशीवर टांकली. जी गोष्ट त्यांच्या मनाविरुध्द वाटत होती तिचा पाठपुरावा त्यांनी केला. समाजाने कितीही विरोध केला तरी ते आपल्या कार्यापासून जराही ढळले नाही. संपूर्ण समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल त्यांना अभिप्रेत होता. प्रबोधनाची चळवळ त्यांनी घराघरपर्यंत पोहचवली. ज्योतीबांनी स्त्रीजीवनाच्या बंधनाचा तडा घालविला. शेतकरी सुखी तर देश सुखी हे तत्व त्यांनी लोकांच्या मनावर ठसविले. त्यांची उक्ती जशी तशीच कृती होती म्हणूनच त्यांना कर्ते सुधारक म्हणून संबोधले जाते. सर्वांगीण समतेचा त्यांनी पाया घातला. ''हिंदू समाजातील बहुजन समाजात आत्मप्रत्यय व आत्मावलोकन उत्पन्न करणारा पहिला माणूस म्हणजे फुले हाय.''

**संदर्भ —**


१. जी.एल.भिडे, एन.डी.पाटील, ''महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास'', फडके प्रकाशन कोल्हापूर, पृ.क्र. ६९,७१

२. प्रा. सौ. माधवी कवी, ''साठ महामानव'', विद्याभारती प्रकाशन, गुजराती शाळेसमोर मेन रोड, लातूर, पृ.क्र. ३४, ३५, ३६

३. पंढरीनाथ सिताराम पाटील, ''महात्मा ज्योतिबा फुले यांचे चरित्र'' रमेश प्रकाशन, २६, गिरीजा सोसायटी, पुणे ३८

४. अजित पाटील, ''खरा महात्मा ज्योतीबा'', सायन पब्लिकेशन्स, प्रा.लि. पुणे २००८

5- भाष्कर लक्ष्मण भोळे, ''महात्मा ज्योतीबा फुले वारसा आणि वसा'', साकेत प्रकाशन, गांधीनगर औरंगाबाद २००५ प्रकाशन, मुंबई २००८